४४०६ वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च या अंतर्गत सामूहिक पातळीवर ठोस वनारोपन कार्यक्रम (४४०६ ०४९२) या योजनेअंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- एफडीएम-२०१७/प्र.क्र.१५४/फ-२
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २३ मार्च, २०१८.

वाचा :-

१) वित्त विभाग परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.०४.२०१७.
२) वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०.०६.२०१७.
३) वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक :- पूरक-२०१७/प्र.क्र.३३५/अर्थ-३, दि.२९.१२.२०१७.
४) वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.०६.०२.२०१८.
५) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक :- पूरक-२०१७/प्र.क्र.२२८/ब-१,दि.३०.१२.२०१७.
६) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक :- एफडीएम-२०१७/प्र.क्र.१५४/फ-२, दि.२८.०२.२०१८.
७) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक :- बीयुडी-२०१८/४४०६/प्र.क्र.३८/ब-१, दि.१२.०३.२०१८.

प्रस्तावना :-

वित्त विभागाने वाचा येथील नमूद केलेल्या परिपत्रकांन्वये निधी वितरणाबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्यास अनुलक्षून तसेच वाचा येथील क्र.७ अन्वये निर्गमीत सन २०१७-१८ चे आठमाही सुधारीत अंदाज विचारात घेता, ४४०६ वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च या अंतर्गत सामूहिक पातळीवर ठोस वनारोपन कार्यक्रम (४४०६ ०४९२) या योजनेअंतर्गत निधी वितरीत करण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ करीता सामूहिक पातळीवर ठोस वनारोपन कार्यक्रम ४४०६ ०४९२ या योजनेअंतर्गत विभागास प्राप्त झालेल्या अर्थसंकल्पीत तरतूदीचे विवरण खालीलप्रमाणे आहे:-

(रु. हजारात)

अ.क्र.	बाब	आठमाही सुधारीत अंदाज	विभागाने अद्याप पर्यंत वितरीत केलेला निधी	प्रस्तुत शासन निर्णयाद्वारे वितरीत करावयाचा निधी
१	२	३	४	५
१	०२ मजूरी	२२२३००३	२१७३००३	५००००
२	२१- पुरवठा व सामुग्री	५११६१९	३६९२९४	१४२३२५
एकूण		२७३४६२२	२५४२२९७	१९२३२५

उपरोक्त विवरणपत्रातील स्तंभ ५ मध्ये दर्शविल्या प्रमाणे (००) (०६) सामूहिक पातळीवर ठोस वनारोपन कार्यक्रम ४४०६ ०४९२ या योजनेअंतर्गत ०२ मजुरी या शिर्षांतर्गत रु.५००.०० लक्ष तसेच २१ पुरवठा व सामुग्री या शिर्षांतर्गत रु.१४२३.२५ लक्ष अशी एकुण रु.१९२३.२५ लक्ष तरतूद खालील अटींच्या अधिन राहून वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

सदर योजनेवर होणारा खर्च, योजनांतर्गत प्रस्तावीत कार्यबाबींना आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे याची खातरजमा झाल्यानंतरच सदर कार्यबाबींवर निधी खर्ची टाकण्यात यावा.

I) वितरीत केलेला निधी शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून, प्रचलित धोरण व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

II) सदरच्या खर्चाच्या अनुषंगाने आवश्यक असलेले लेखे व्यवस्थित/अचूक ठेवण्याबाबत दक्षता घ्यावी.

III) कार्यबाबींमध्ये खरेदीचा समावेश असल्यास शासनाने विहित केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करण्यात यावी.

IV) सदर निधी कोणत्याही परिस्थितीत बँक खात्यात अथवा स्विय प्रपंची लेखा अंतर्गत जमा करण्यात येऊ नये तसेच प्रत्यक्षात कोषागारातील पैसे काढल्यानंतर खर्च झाल्याबाबत हमी देण्यात यावी.

सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०६.०२.२०१८, व महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.पूरक-२०१७/प्र.क्र.२२८/ब-१, दिनांक ३०.१२.२०१७, वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.२६/अर्थ-६/१८ दिनांक :- २०.०२.२०१८ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२३१३०२५४२११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2018.03.23 13:07:17 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव
महसूल व वन विभाग

प्रति :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर.

२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर.

३) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद, गडचिरोली, कोल्हापूर, अमरावती, नागपूर, ठाणे, चंद्रपूर, पुणे, यवतमाळ, धुळे, नाशिक

४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

५) सह सचिव, वित्त विभाग (अर्थ-३), मंत्रालय, मुंबई-३२.

६) जिल्हा कोषागार अधिकारी कोल्हापूर / सांगली

७) ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.

८) निवडनस्ती , फ-२ कार्यासन,महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.